महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
संचालनालय, लेखा व कोषागारे
मुंबई पोर्ट ट्रस्ट, पोर्ट हाऊस, ठाकरसी हाऊस,
३ रा मजला, जे .एन.हर्डिया मार्ग , बेलार्ड इस्टेट, मुंबई ४०० ००१
दुरध्वनी क्र. ०२२. २२६२२०२९/२०३६ E-mail -jd.admin@ gmail.com

## बाह्ययंत्रणेमार्फत मनुष्यबळ पुरविणा-या संस्थांकडून ई-निविदा मागविणेबाबत

वित्त विभाग, महाराष्ट्र शासन, यांच्या अधिनस्त संचालनालय लेखा व कोषागारे, मुंबई, अधिदान व लेखा कार्यालय चर्चगेट व वांद्रे,मुंबई ६ प्रादेशिक सहसंचालक कार्यालये व त्यांच्या अधिनस्त ३४ जिल्हा कोषागार कार्यालयांमध्ये १०० कनिष्ठ लेखापाल व १०५ लेखा लिपीक अशी एकूण २०५ पदे बाह्ययंत्रणेद्वारे कंत्राटी तत्वावर तात्पुरत्या स्वरुपात भरावयाची आहेत. पदांचा विभागनिहाय तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कार्यालयाचे नाव | लेखा लिपीक | कनिष्ठ लेखापाल |
|---|---|---|---|
| १ | अधिदान व लेखा कार्यालय, चर्चगेट व बांद्रे, मुंबई | १५ | ५० |
| २ | संचालनालय, ले व को, मुंबई, सहसंचालक ले व को, कोकण विभाग व अधिनस्त कोषागार कार्यालय ठाणे/रायगड /रत्नागिरी /सिंधुदुर्ग /पालघर | २७ | ११ |
| ३ | सहसंचालक, ले व को, पुणे विभाग व अधिनस्त कोषागार कार्यालय पुणे/सातारा /सांगली/सोलापूर/कोल्हापूर | १० | २१ |
| ४ | सहसंचालक, ले व को, नाशिक विभाग व अधिनस्त कोषागार कार्यालय नाशिक /धुळे /जळगांव /नंदुरबार /अहमदनगर | १६ | २ |
| ५ | सहसंचालक, ले व को, औरंगाबाद विभाग व अधिनस्त कोषागार कार्यालय औरंगाबाद /जालना /बीड /हिंगोली /परभणी /लातूर /नांदेड / उस्मानाबाद | ८ | ३ |
| ६ | सहसंचालक, ले व को, अमरावती विभाग व अधिनस्त कोषागार कार्यालय अमरावती /बुलढाणा /अकोला /वाशिम /यवतमाळ | १० | १० |
| ७ | सहसंचालक, ले व को, नागपूर विभाग व अधिनस्त कोषागार कार्यालय नागपूर /चंद्रपूर /वर्धा / भंडारा /गोंदिया /गडचिरोली | १९ | ३ |
| | **एकूण** | **१००** | **१०५** |

**बाह्ययंत्रणेमार्फत भरण्यात येणा-या पदांसाठीच्या अटी**

**अ:** बाह्ययंत्रणेव्दारे पुरविण्यात येणा-या **"लेखा लिपीक"** पदांचे अनुषंगाने खालीलप्रमाणे अर्हता विहीत करण्यात येत आहे.

1. उमेदवार भारताचा नागरिक असावा व त्यास मराठी भाषा बोलता, लिहीता व वाचता येणे आवश्यक आहे. तसेच इंग्रजीचे किमान ज्ञान असणे आवश्यक आहे.
2. उमेदवाराचे वय १८ ते ३३ च्या दरम्यान असावे.
3. उमेदवाराची शैक्षणिक अर्हता व कामाचे स्वरुप:

(१) **शैक्षणिक अर्हता** :- जाहिरातीच्या दिनांकास किमान ५५ % गुणांसह माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परिक्षा उत्तीर्ण केलेली असावी.

परंतू पुढील उच्च अर्हता धारण करणा-या उमेदवारांना अधिक पसंती देण्यात येईल-

(अ) वाणिज्य विषयासह उच्च माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा किंवा

(ब) वाणिज्य शाखेची पदवी किंवा

(क) सांख्यिकी, गणित किंवा अर्थशास्त्र असा मुख्य विषय घेऊन कला शाखेची पदवी किंवा

(ड) सांख्यिकी किंवा गणित असा मुख्य विषय घेऊन विज्ञान शाखेची पदवी किंवा

(इ) भारतीय परिव्यय व कार्य लेखापाल संस्थेकडून घेण्यात येणारी परिव्यय लेखाशास्त्राची अंतिम परीक्षा उत्तीर्ण केली असेल किंवा

(फ) व्यवसाय प्रशासनाची पदवी किंवा

(ग) सनदी लेखापालाची मध्यमस्तरीय परीक्षा उत्तीर्ण केली असेल,

**इतर अर्हता :-** जाहिरातीच्या दिनांकास, MS-CIT ही संगणक परीक्षा उत्तीर्ण असणे तसेच ३० शब्द प्रति मिनिट मराठी टंकलेखनाचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र राज्याचा अधिवास दाखला असणे आवश्यक आहे.

(२) **कामाचे स्वरुप** :

उमेदवाराला प्रामुख्याने निम्नश्रेणी लिपिक वर्गीय कामकाज जसे,आवक-जावक नोंदणी, टंकलेखन, अभिलेख व नोंदवहया व्यवस्थापन अशा स्वरुपाचे कामकाज संगणकाच्या सहाय्याने अथवा मनुष्यबळाने करावे लागेल.

**ब:** बाह्ययंत्रणेव्दारे पुरविण्यात येणा-या **"कनिष्ठ लेखापाल"** पदांचे अनुषंगाने खालीलप्रमाणे अर्हता विहीत करण्यात येत आहे.

१. उमेदवार भारताचा नागरिक असावा व त्यास मराठी भाषा बोलता , लिहीता व वाचता येणे आवश्यक आहे.तसेच इंग्रजीचे किमान ज्ञान असणे आवश्यक आहे.

२ उमेदवाराचे वय १८ ते ३३ च्या दरम्यान असावे.

**३. उमेदवाराची शैक्षणिक अर्हता व कामाचे स्वरुप:-**

**१. शैक्षणिक अर्हता:-**

(अ) जाहिरातीच्या दिनांकास किमान ५५% गुणांसह वाणिज्य शाखेतील पदवीधर. असणे आवश्यक आहे, किंवा

(ब) सांख्यिकी, गणित किंवा अर्थशास्त्र असा मुख्य विषय घेऊन किमान ५५% गुणांसह कला शाखेची पदवी किंवा

(क) सांख्यिकी किंवा गणित असा मुख्य विषय घेऊन किमान ५५% गुणांसह विज्ञान शाखेची पदवी किंवा

(ड) भारतीय परिव्यय व कार्य लेखापाल संस्थेकडून घेण्यात येणारी परिव्यय लेखाशास्त्राची अंतिम परीक्षा उत्तीर्ण केली असेल किंवा

(ई) व्यवसाय प्रशासनाची पदवी किंवा

(फ) सनदी लेखापालाची मध्यमस्तरीय परीक्षा उत्तीर्ण केली असेल

**इतर अर्हता:-**

जाहिरातीच्या दिनांकास, MS-CIT ही संगणक परीक्षा उत्तीर्ण असणे तसेच टंकलेखनाचे जुजबी ज्ञान असणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र राज्याचा अधिवास दाखला असणे आवश्यक आहे.

**२. कामाचे स्वरुप:-**

उमेदवाराला प्रामुख्याने लेखांकन नोंदवहया, चलन, data entry लेखांकन नैमित्तिक पत्रव्यवहार व अन्य लेखा विषयक संगणकीय कामकाज करावे लागेल.

**क: बाह्ययंत्रणेमार्फत मनुष्यबळ पुरविण्या-या संस्थांसाठी अटी व शर्ती --**

| | |
|---|---|
| १. | संबंधित संस्था ही खालीलपैकी एका कायद्यांतर्गत नोंदणीकृत असणे आवश्यक आहे. ( नोंदणी प्रमाणपत्राची प्रत सोबत जोडणे आवश्यक आहे ).<br>• मुंबई दुकाने व आस्थापना विभाग.<br>• भागीदारी संस्था अधिनियम.<br>• सहकारी संस्था अधिनियम.<br>• कंपनी अधिनियम. |
| २. | कंत्राटाची रक्कम एकूण रक्कम अंदाजे रु.४,७८,००,०००/-एवढी राहील. (रु.चार कोटी अठ्ठ्याहत्तर लाख फक्त) |
| ३. | ई- निविदा अर्जासोबत निविदा फॉर्म शुल्क रु.२०,०००/- व बयाना रक्कम (earnest money deposit) रु. २,००,०००/- ऑनलाईन स्वरुपात DIRECTORATE OF ACCOUNTS & TREASURIES, MUMBAI यांचे नांवे INDIAN BANK, NARIMAN POINT, ACCOUNT NO.416199015, IFSC CODE IDIB 000N052 मध्ये भरणे आवश्यक आहे. |
| ४. | कंत्राटदाराने मनुष्यबळ पुरविल्यानंतर त्या बाबतचा पारिश्रमिक/मोबदला हा मासिक (man month) तत्वावर, कंत्राटदाराने दोन प्रतीत बिल, पुरविलेल्या मनुष्यबळाच्या हजेरीपत्रकासह सादर केल्यानंतर, ६० दिवसांच्या आंत देण्यात येईल. तसेच पारिश्रमिक/मोबदला देण्यास कोणत्याही कारणास्तव उशीर झाला तर त्यावर कोणत्याही प्रकारचे व्याज देण्यात येणार नाही. |
| ५. | दरमहा अदा होणा-या देयकामधून नियमानुसार आयकर, GST व अन्य आवश्यक वजाती करण्यात येतील . |
| ६. | संस्थेमार्फत पुरविण्यात येणा-या उमेदवारांचे मासिक पारिश्रमिक अनिवार्य वजाती (EPF अंतर्गत वर्गणी व इतर) करुन त्यांच्या बँक खात्यामध्ये अदा केल्याचा पुरावा प्रमाणपत्रासह (bank statement etc.) संबंधित विभागीय सहसंचालक कार्यालय तसेच अधिदान व लेखा कार्यालय यांना दरमहा दि.२५ तारखेपूर्वी सादर करावा लागेल. तद्नंतरच संस्थेचे पुढील महिन्याचे देयक पारित करण्यात येईल. |
| ७. | मागील २ वर्षाच्या कालावधीत किमान २ शासकीय / निमशासकीय कार्यालयांना कंत्राटीतत्वावर, लिपिक वर्गीय अथवा लेखा विषयक कामासाठी मनुष्यबळ पुरविल्याबाबतचा व त्यांचे काम समाधानकारक असल्याचे संबंधित कार्यालयाचे प्रमाणपत्र अपलोड करणे आवश्यक आहे. |

| | |
|---|---|
| ८. | यशस्वी निविदाकाराला संचालनालयाकडे रु.२५,००,०००/- इतकी सुरक्षा ठेव म्हणून राष्ट्रीयीकृत बँकेची बँक गॅरेंटी सादर करावी लागेल. |
| ९. | बाह्ययंत्रणेव्दारे पुरविण्यात आलेल्या मनुष्यबळांसंदर्भात करण्यात आलेल्या कराराचा कालावधी एक वर्षाचा राहिल. आवश्यकतेनुसार सदर करारास १ वर्षाची मुदतवाढ देण्यात येईल. अशा प्रकारची मुदतवाढ जास्तीत जास्त दोन वेळा शासन मान्यतेच्या अधीन राहून देण्यात येईल. संबंधित पुरवठादारसंस्थेशी करण्यात आलेला करार चालू ठेवण्याचे / संपुष्टात आणण्याचे सर्व अधिकार संचालक लेखा व कोषागारे , मुंबई यांचे स्वाधीन असतील. संस्थेस सदर करार संपुष्टात आणावयाचा असल्यास संचालनालयास तीन महिन्यांची नोटीस देणे आवश्यक राहिल. तसेच संचालनालयास मुदत पूर्ण होण्याआधी करार संपुष्टात आणावयाचा असल्यास संस्थेस तशी पूर्व सूचना कोणतेही कारण न देता एक महिना अगोदर देऊन करार संपुष्टात आणला जाईल. संस्थेकडून करारातील अटी व शर्तींचे पालन समाधानकारक रित्या न झाल्यास करार केंव्हाही संपुष्टात आणण्याचा / कराराची मुदतवाढ करणे / मुदत कमी करणे याबाबतचा अंतिम निर्णय संचालक, लेखा व कोषागारे , मुंबई यांचे असतील. जर सदर करारास मुदत वाढ दिल्यास उमेदवाराचे मासिक पारिश्रमिक जुन्या करारातील दरानेच देण्यात येतील. |
| १०. | संस्थेची मागील २ वर्षाची वार्षिक उलाढाल २ कोटी पेक्षा कमी नसावी. तसेच सनदी लेखापालांकडून प्रमाणित करण्यात आलेल्या मागील २ वर्षांच्या ताळेबंदांच्या (Audited Balance Sheet) प्रती अपलोड करण्यात याव्यात. संस्थेच्या मागील २ वर्षाच्या आयकर परताव्याच्या ( Income tax Returns) प्रती अपलोड करण्यात याव्यात . |
| ११. | संस्थेकडून देण्यात आलेल्या उमेदवारास त्यांचे मासिक पारिश्रमिक अदा करण्याची जबाबदारी सर्वस्वी संस्थेची राहील. तसेच उमेदवार कार्यालयात अनुपस्थित राहिल्यास देयकातील रकमेतून त्या कालावधीची रक्कम वजा करण्यात येईल. |
| १२. | संस्थेमार्फत पुरविण्यात येणारा उमेदवार गुन्हेगारी पार्श्वभूमीचा नसावा. उमेदवारांची सचोटी/ चारित्र्याबाबतचा पोलिसांचा दाखला संस्थेने योग्य कालावधीत सादर करणे आवश्यक राहील. तसेच कार्यालयीन कामकाजात उमेदवारांकडून कसूर /आर्थिक गैरव्यवहार झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संस्थेची राहील आणि झालेल्या आर्थिक नुकसानीची वसुली संस्थेकडून करण्यात येईल. **उमेदवार वैद्यकीयदृष्टया कामकाज करण्यास सक्षम असावेत.** |
| १३. | कायमस्वरुपी शासकीय नोकरीसाठी कार्यालयाकडे / शासनाकडे / न्यायालयाकडे दावा अथवा खटला भरणार नाही अशा आशयाचे उमेदवाराचे व संस्थेचे हमीपत्र सेवेत हजर होताना संस्थेने कार्यालयास देणे आवश्यक राहिल. |
| १४. | बाह्ययंत्रणेव्दारे उपलब्ध होणा-या उमेदवारांची सेवा पूर्णपणे कंत्राटी व तात्पुरत्या स्वरुपाची असून त्यांना भविष्यात या पदावर नियुक्तीचा अधिकार प्राप्त होणार नाही. कायमस्वरुपी शासकीय कर्मचा-यास सेवेत मिळणा-या लाभांकरीता बाह्ययंत्रणाव्दारे/कंत्राटीतत्वावर नियुक्ती मिळणारे उमेदवार पात्र असणार नाहीत. तसेच त्यांच्या सेवेचे कोणतेही उत्तरदायित्व शासनावर / संचालनालयावर असणार नाही. |
| १५ | रोजगार व स्वयंरोजगार विभाग, शासन निर्णय क्र. रोस्वरो २००२/प्रक्र २६७/रोस्वरो-१, दिनांक १७.०८.२००२ मधील अ क्र ८ अन्वये शासकीय कार्यालयांमध्ये किंवा निमशासकीय आणि |

| | |
|---|---|
| | स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्यालयांमध्ये सेवेचा पुरवठाकरिता निविदा भरताना अनामत रक्कम भरण्याच्या अटीतून नोंदणीकृत बेरोजगारांच्या सहकारी सेवा संस्थांना / लोकसेवा केंद्राना सूट देण्यात आली आहे. |
| १६. | कोणतीही ई निविदा स्विकारण्याचा किंवा एखादी अथवा सर्वच ई निविदा कारण न देता नाकारण्याचा हक्क संचालनालयास राहिल. |
| १७. | दरकरारा संबंधीचा पत्रव्यवहार संचालनालय लेखा व कोषागारे, मुंबई यांचेशी करण्यात यावा. |
| १८. | **कराराच्या अनुषंगाने यशस्वी निविदाकार व संचालनालय यांच्यात न्यायालयीन प्रकरण उद्भवल्यास ते मुंबई स्थित न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रात राहिल, व त्याबाबतची त्याची सर्वस्वी जबाबदारी व खर्च संबंधित संस्थेची राहिल.** |
| १९. | संचालनालयाचे यशस्वी निविदाकारास मनुष्यबळ पुरविण्याचे आदेश प्राप्त झाल्यापासून एक महिन्याच्या आत पदांसाठी विहित केलेल्या अर्हतेनुसार उमेदवार उपलब्ध करुन देणे संस्थेस बंधनकारक आहे. तसेच मागणीनुसार संस्थेने उमेदवार उपलब्ध न करुन दिल्यास त्यांचेवर नियमानुसार दंडात्मक कार्यवाही करण्यात येवून प्रती दिन, प्रती उमेदवार रु. २००/- चा दंड संस्थेकडून घेण्यात येईल. |
| २०. | बाह्ययंत्रणेव्दारे पुरविण्यात आलेल्या मनुष्यबळाचे कामकाज समाधानकारक नाही, असे निदर्शनास आल्यास त्याऐवजी इतर उमेदवार तात्काळ उपलब्ध करण्याची जबाबदारी संस्थेची राहिल. १५ दिवसाचे आत उमेदवार उपलब्ध न करुन दिल्यास संस्थेवर नियमानुसार दंडात्मक कार्यवाही करण्यात येवून प्रती दिन, प्रती उमेदवार रु. २००/- चा दंड संस्थेकडून घेण्यात येईल. |
| २१. | बाह्ययंत्रणेव्दारे प्राप्त उमेदवारास कोणत्याही स्वरुपाची गंभीर इजा / दुखापत झाल्यास उपचाराच्या खर्चाचे कोणतेही दायित्व संचालनालय / शासनाचे असणार नाही. त्याची सर्वस्वी जबाबदारी संस्थेची राहील. |
| २२. | शासकीय कामकाजाचे अनुषंगाने आवश्यक गोपनियतेचा भंग होणार नाही याची जबाबदारी प्राप्त उमेदवार तसेच संस्थेची असेल. अशा गोपनीयतेचा भंग झाल्यास संस्था तसेच उमेदवारावर कायदेशीर कार्यवाही करण्याचे हक्क संचालनालयास असतील. |
| २३. | बाह्ययंत्रणेव्दारे प्राप्त उमेदवारांना कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन कामकाजाचे वेळेत उपस्थित असणे बंधनकारक राहिल. तसेच आवश्यकता असल्यास जादा वेळ कार्यालयात थांबावे लागेल. तसेच वेळप्रसंगी कामाची निकड विचारत घेवून सुटीचे दिवशी कार्यालयात उपस्थित राहणे आवश्यक राहिल. |
| २४. | शासनाच्या कार्यालयीन मालमत्तेची काळजी / देखभाल संबंधित उमेदवाराने करणे आवश्यक राहिल तसेच त्याचे नुकसान झाल्यास त्याची जबाबदारी संबंधित संस्थेची असेल. |
| २५. | बाह्ययंत्रणेव्दारे मनुष्यबळ उपलब्ध करण्यासाठी प्राप्त होणा-या निविदांपैकी ज्या संस्थेशी करार करण्यात येईल त्यांनी सर्व अटी व शर्ती मान्य असल्यास त्यांच्या सेवा पुरविण्यासाठीचा करार रु. १००/- चे स्टॅम्प पेपर वर करणे आवश्यक आहे. |
| २६. | बाह्ययंत्रणेव्दारे प्राप्त होणा-या उमेदवारांना कोणत्याही प्रकारचे भत्ते लागू असणार नाही. तसेच जाण्या-येण्याचा खर्चही पुरविण्यात येणार नाही. तथापी कार्यालयाचे आदेशानुसार कार्यालयीन कामाकरीता केलेल्या प्रवासा संबंधाने कार्यालयाचे मंजूरीने अनुज्ञेय असणारा प्रत्यक्षातील खर्च देण्यात येईल. |

| | |
|---|---|
| २७. | **ई-निविदा भरताना संस्थेने जाहिरातीत दर्शविण्यात आलेल्या पदांसाठी प्रती पद ,प्रती उमेदवार विभागनिहाय दर सादर करणे आवश्यक आहे. निविदा भरताना संस्थांनी सर्व कार्यालये /विभागांसाठीचे दर भरणे आवश्यक राहील. सर्व कार्यालये /विभागांसाठी दर न भरलेल्या निविदा बाद ठरविण्यात येतील.** |
| २८. | सदर ई-निविदा पूर्णपणे एकाच निविदाकारास अथवा विभागून एकापेक्षा जास्त निविदाकारास देण्याचे अधिकार संचालक, लेखा व कोषागारे यांचे स्वाधीन राहतील. |
| २९. | एकदा निविदा भरल्यावर निविदाकाराला निविदेच्या सर्व अटी शर्ती मान्य असल्याचे समजण्यात येईल.तसेच निविदाकाराने निविदा भरताना त्याच्या स्वत:च्या अटी शर्ती नमूद केल्यास त्या निविदाकाराची निविदा बाद ठरविण्यात येईल. |
| ३०. | मनुष्यबळ पुरवठा करणा-या संस्थेस निविदेत नमुद करण्यात आलेल्या दरापेक्षा कमी दराने अन्य कोणत्याही शासकीय कार्यालयांमध्ये मनुष्यबळ उपलब्ध करून देत नसल्याचे प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक असेल.तथापी ज्या संस्थेशी करार करण्यात येईल त्या संस्थेने संचालनालयास दिलेल्या दरापेक्षा कमी दराने अन्य शासकीय कार्यालयास मनुष्यबळ उपलब्ध करून दिल्याचे आढळून आल्यास संस्थेस कमी दराने मनुष्यबळ उपलब्ध करून द्यावे लागेल व त्या नुसार ठरणा-या अतिरीक्त रकमेचे प्रदान संचालनालयास परत करावे लागेल. |
| ३१. | मनुष्यबळ पुरवठादार संस्थेने अन्य सेवापुरवठादार संस्थेशी उपकरार करु नये. |
| ३२. | निविदेची वैधता निविदा उघडल्याच्या दिनांकापासून ६ महिने राहील. |
| ३३. | निवड झालेल्या संस्थेने करार करण्यास नकार दिल्यास संस्थेने भरलेली अनामत रक्कम जप्त केली जाईल. |
| ३४. | निविदा प्रक्रिया सुरु करण्यापूर्वी , सुरु असताना किंवा त्यानंतरचे कालावधीत त्यात काही बदल करणे / निविदेच्या अटी व शर्ती / तांत्रिक बाबींमध्ये बदल करावयाचे झाल्यास त्याबाबतची माहिती शुध्दीपत्रकाव्दारे प्रसिध्द करण्यात येईल. त्याचे अधिकार पूर्णत: संचालक लेखा व कोषागारे यांना असतील. |
| ३५. | संस्थाचालकांनी निविदा भरण्यासाठी त्यांचे अधिनस्त असलेल्या अधिकारी /कर्मचा-यास सदर निविदेचे कागदपत्र साक्षांकित करण्याची परवानगी दिली असल्यास त्या संदर्भाने आवश्यक कागदपत्र ( authority letter ) अपलोड करण्यात यावे. |
| ३६. | उपरोक्त अटी व शर्तींमध्ये काही अटींचा समावेश करण्यात आला नसल्यास महाराष्ट्र शासनाने निविदेसाठी वेळोवेळी निर्गमित केलेल्या अटी लागू राहतील. |
| ३७. | ई-निविदा भरण्याचा दिनांक:- १०.१०.२०१७ ते दि.२५.१०.२०१७ (रात्रौ.१२.०० वाजेपर्यंत) |
| ३८. | ई-निविदा उघडण्याचा दिनांक:- २६.१०.२०१७ वेळ:-सकाळी ११.३० वाजता<br><br>स्थळ:- संचालनालय, लेखा व कोषागारे,मुंबई पोर्ट ट्रस्ट, पोर्ट हाऊस, ठाकरसी हाऊस,<br>३ रा मजला, जे .एन.हर्डिया मार्ग , बेलार्ड इस्टेट, मुंबई ४०० ००१. |

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
संचालनालय, लेखा व कोषागारे
मुंबई पोर्ट ट्रस्ट, पोर्ट हाऊस, ठाकरसी हाऊस,
३ रा मजला, जे .एन.हर्डिया मार्ग , बेलार्ड इस्टेट, मुंबई ४०० ००१
दुरध्वनी क्र. ०२२. २२६२२०२९/२०३६ E-mail -jd.admin@ gmail.com

---

महाराष्ट्र शासन, वित्त विभागातील, संचालनालय लेखा व कोषागारे, मुंबई, अधिदान व लेखा कार्यालय चर्चगेट व वांद्रे, ६ प्रादेशिक सहसंचालक कार्यालये व त्यांच्या अधिनस्त ३४ जिल्हा कोषागार कार्यालयांमध्ये १०० कनिष्ठ लेखापाल व १०५ लेखा लिपीक अशी एकूण २०५ पदे बाह्ययंत्रणेद्वारे भरावयाची आहेत. पदांचा विभागनिहाय तपशील तसेच अन्य अटी व शर्ती संचालनालनयाचे संकेतस्थळा वर (website) उपलब्ध आहेत. यासाठी संचालनालयाचे संकेतस्थळ https://mahakosh.maharashtra.gov.in यावर जाऊन Tenders and Quotations यावर क्लिक करावे.

संबंधित संस्थानी दरपत्रके सादर करावयाचे विहीत नमुने.

---

फॉर्म- अ : तांत्रिक बाबींसाठी लिफाफा क्र. १

---

| अ.क्र. | | संस्थेचा तपशिल |
|---|---|---|
| १. | संस्थेचे नाव | |
| २. | नोंदणीचा प्रकार / क्रमांक<br>• मुंबई दुकाने व आस्थापना अधिनियम,<br>• भागीदारी संस्था अधिनियम,<br>• सहकारी संस्था अधिनियम<br>• कंपनी अधिनियम | |
| ३. | शासन निर्णय दिनांक १७.०८.२००२ मधील तरतुदीनुसार संस्था बेराजगार सहकारी सेवा संस्था / लोकसेवा केंद्र याअतंर्गत नोंदणीकृत आहे काय ? | |
| ४. | कार्यालयाचा पत्ता व दूरध्वनी क्रमांक | |
| ५. | मागील २ वर्षाच्या कालावधीत शासकीय / निमशासकीय कार्यालयांमध्ये बाह्ययंत्रणेव्दारे मनुष्यबळ उपलब्ध करुन दिल्याचा तपशील. ( कार्यालयांची नावे / दुरध्वनी क्रमांक / पत्ते )<br>( लिपीक वर्गीय अथवा लेखाविषयक कामे ) | |
| ६. | उपलब्ध करुन दिलेल्या उमेदवारांचे मासिक वेतन प्रत्येक महिन्यात ECS /NEFT व्दारे बँकेत जमा करण्यास व तसा पुरावा संचालनालयास सादर करण्यास संस्थेची तयारी आहे काय? | |
| ७. | मागील तीन वर्षांचे सनदी लेखापाल यांनी लेखा परिक्षण केलेले व प्रमाणित केलेले ताळेबंद (Audited Balance Sheet) | |
| ८. | मूळ निवीदा अर्ज (सर्व पृष्ठांवर स्वाक्षरीसह ) | |

निविदा तांत्रिक लिफाफा - यामध्ये पुढील बाबींचा समावेश खालील नमुन्यात असावा व तो अपलोड करण्यात यावा.

i. निविदा प्रक्रिया शुल्क रु.२०,०००/-आणि बयाणा रक्कम रु. २,००,०००/- ऑनलाईन प्रदान केल्याची पावती अपलोड करण्यात यावी.

ii. पॅन कार्ड ची छायांकित प्रत अपलोड करण्यात यावी.

iii. सेवा कर / जीएसटी नोंदणी प्रमाणपत्राची प्रत अपलोड करण्यात यावी.

iv. उमेदवारांना ECS /NEFT द्वारे वेतन अदा करण्याची संस्थेची तयारी असल्याचे प्रमाणपत्र संस्थाचालकांचे सही शिक्यासह अपलोड करण्यात यावे.

v. मागील २ वर्षात किमान २ शासकीय /निमशासकीय कार्यालयांना बाह्ययंत्रणेव्दारे मनुष्यबळ पुरविल्याबाबत व त्यांचे काम समाधानकारक असल्याचे संबंधित कार्यालयाचे प्रमाणपत्र .( लिपीक वर्गीय अथवा लेखाविषयक कामे ) अपलोड करण्यात यावे.

vi. मागील तीन वर्षांचे सनदी लेखापाल यांनी लेखा परिक्षण केलेले व प्रमाणित केलेले ताळेबंद (Audited Balance Sheet) अपलोड करण्यात यावीत.

vii. रोजगार व स्वयंरोजगार विभाग, शासन निर्णय क्र. रोस्वरो २००२/प्रक्र २६७/रोस्वरो-१, दिनांक १७.०८.२००२ मधील अ क्र ८ अन्वये शासकीय कार्यालयांमध्ये किंवा निमशासकीय आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्यालयांमध्ये सेवेचा पुरवठाकरिता निविदा भरताना अनामत रक्कम भरण्याच्या अटीतून पंजीकृत बेरोजगारांच्या सहकारी सेवा संस्थांना / लोकसेवा केंद्राना सूट देण्यात आली आहे त्याअनुषंगे आवश्यक प्रमाणपत्र अपलोड करण्यात यावे.

संचालनालय, लेखा व कोषागारे, कार्यालय मुंबई यांनी बाह्ययंत्रणेव्दारे पदे भरणेसाठी मागविलेल्या दरपत्रकातील अटी /शर्ती या संस्थेस मान्य असून, वरील जोडपत्र-अ मधील माहिती सत्य आहे. ( तांत्रिक लिफाफा क्र १ ची साक्षांकित प्रत अपलोड करण्यात यावी)

स्थळ : संस्था चालकाची स्वाक्षरी_____________

स्वाक्षरीताचेनाव______________________

दिनांक : कार्यालयाचा शिक्का _________________

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
संचालनालय, लेखा व कोषागारे
मुंबई पोर्ट ट्रस्ट, पोर्ट हाऊस, ठाकरसी हाऊस,
३ रा मजला, जे .एन.हर्डिया मार्ग , बेलार्ड इस्टेट, मुंबई ४०० ००१
दुरध्वनी क्र. ०२२. २२६२२०२९/२०३६ E-mail -jd.admin@ gmail.com

फॉर्म - ब : व्यापारी दरा संबधीचा लिफाफा क्र. २.

| अ.क्र. | तपशिल | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | संस्थेचे नाव व नोंदणी क्रमांक : | | | | | |
| **अ.क्र.** | **कार्यालयनिहाय तपशील** | **लेखा लिपीक** | **दर (प्रतीमाह प्रती उमेदवार)** | **कनिष्ठ लेखापाल** | **दर (प्रतीमाह प्रती उमेदवार)** | **एकूण (३x४)+(५x६)** |
| **१** | **२** | **३** | **४** | **५** | **६** | **७** |
| १ | मुंबई विभाग ( अधिदान व लेखा कार्यालय ) | १५ | | ५० | | |
| २ | संचालनालय, ले व को, मुंबई व सहसंचालक, ले व को, कोकण विभाग ( ठाणे/रायगड/रत्नागिरी/सिंधुदुर्ग/पालघर) | २७ | | ११ | | |
| ३ | सहसंचालक, ले व को, पुणे विभाग ( पुणे/सातारा/सांगली/सोलापूर/कोल्हापूर) | १० | | २१ | | |
| ४ | सहसंचालक, ले व को, नाशिक विभाग ( नाशिक /धुळे/ जळगांव/ नंदूरबार/अहमदनगर) | १६ | | २ | | |
| ५ | सहसंचालक, ले व को, औरंगाबाद विभाग ( औरंगाबाद /बीड/ लातूर/हिंगोली/जालना/परभणी/ उस्मानाबाद/नांदेड ) | ८ | | ३ | | |
| ६ | सहसंचालक, ले व को, अमरावती विभाग ( अमरावती/अकोला/बुलडाणा/यवतमाळ/वाशिम) | १० | | १० | | |
| ७ | सहसंचालक, ले व को, नागपूर विभाग ( नागपूर/भंडारा/गोंदिया/गडचिरोली/वर्धा/चंद्रपूर) | १९ | | ३ | | |
| | **एकूण** | **१००** | | **१०५** | | |

टिप : दर प्रती पद प्रती माह या पध्दतीने देण्यात यावा.

१. उपरोक्त विवरणपत्रात दर्शविण्यात आलेल्या सर्व विभागांसाठी ( अनु क्र १ ते ७)संस्थेने दर भरणे अनिवार्य राहिल. ज्या दर पत्रकात सर्व विभागांसाठीचे दर भरण्यात आलेले नसतील अशा दरपत्रिका विचारात न घेता बाद करण्यात येतील.

२. संस्थेने त्यांचे दर ऑनलाईन पध्दतीने सोबतच्या BOQ ( Bill of Quantity) या एक्सेलशीट मध्ये भरावेत.
Kindly quote your rates in excel sheet enclose as BOQ ( Bill of Quantity )

३. वरील दोन्ही तांत्रिक /व्यापारी लिफाफे ( Technical / Commercial ) स्वतंत्रपणे ऑनलाईन पध्दतीने भरण्यात यावेत.

४. तांत्रिक लिफाफा क्र १ ची साक्षांकित प्रत अपलोड करण्यात यावी .

४. विहीत नमुन्यात नसलेल्या ई-निविदा , संबंधित निविदाकारास सूचना न देता नाकारण्यात येतील.

स्थळ : संस्था चालकाची स्वाक्षरी____________

स्वाक्षरीताचेनाव_____________________

दिनांक :                                        कार्यालयाचा शिक्का ________________

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
संचालनालय, लेखा व कोषागारे
मुंबई पोर्ट ट्रस्ट, पोर्ट हाऊस, ठाकरसी हाऊस,
३ रा मजला, जे .एन.हर्डिया मार्ग , बेलार्ड इस्टेट, मुंबई ४०० ००१

दुरध्वनी क्र. ०२२. २२६२२०२९/२०३६                    E-mail -jd.admin@ gmail.com

क्र. संलेको/प्रशाकोषा /कार्या ५/प्रक्र २०२२ / बाह्ययंत्रणा /पदभरती /२०१७                    दिनांक

प्रति,

सहाय्यक संचालक ,
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासकीय इमारत,
मुंबई.

विषय : बाह्ययंत्रणेकरुन मनुष्यबळ पुरविणा-या संस्थांकडून ई निविदा
मागविण्यासाठी निविदा सूचना वृत्तपत्रात प्रसिध्द करण्याबाबत .

संचालनालय लेखा व कोषागारे ,मुंबई व अधिनस्त विभागीय सहसंचालक , ३४ कोषागार कार्यालये तसेच अधिदान व लेखा कार्यालय मुंबई येथे १०० लेखा लिपीक व १०५ कनिष्ठ लेखापालांची एकूण २०५ पदे ई निविदा प्रक्रिया राबवून बाह्ययंत्रणेव्दारे भरावयाची आहेत. त्या अनुषंगाने मासिक दराने मनुष्यबळ पुरविणा-या संस्थांकडून ई-निविदा मागविण्या संदर्भात संक्षिप्त जाहिरात /निविदा सूचना सोबत प्रसिध्दीकरिता जोडत आहे. तरी आपल्यास्तरावरुन उचित कार्यवाही करावी , ही विनंती.

| | | |
|---|---|---|
| १ | जाहिरात प्रसिध्द होण्याची तारीख | दिनांक |
| २ | कोणत्या वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करावयाची आहे | जास्त खपाच्या राज्यस्तरीय दैनिक मराठी वृत्तपत्रात |
| ३ | किती वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करावयाची आहे | दोन |
| ४ | वरील वृत्तपत्रात जाहिरात किती वेळा प्रकाशित करावयाची आहे | फक्त एकदाच |
| ५ | कोणत्या कार्यालयातील अधिका-यांना या जाहिराती संबंधीचे देयक पाठवायचे आहे. | लेखा अधिकारी ( रचना व कार्यपध्दती )<br>संचालनालय , लेखा व कोषागारे,<br>मुंबई पोर्ट ट्रस्ट, पोर्ट हाऊस, ठाकरसी हाऊस,<br>३ रा मजला, जे .एन.हर्डिया मार्ग , बेलार्ड इस्टेट,<br>मुंबई ४०० ००१ |

( विकास देसाई )
सहसंचालक ( प्रशासन )
संचालनालय ,लेखा व कोषागारे

सोबत : संक्षिप्त जाहिरातीचा नमुना

मुंबई.

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
संचालनालय, लेखा व कोषागारे
मुंबई पोर्ट ट्रस्ट, पोर्ट हाऊस, ठाकरसी हाऊस,
३ रा मजला, जे .एन.हर्डिया मार्ग , बेलार्ड इस्टेट, मुंबई ४०० ००१
दुरध्वनी क्र. ०२२. २२६२२०२९/२०३६ E-mail-jd.admin@mahakosh.in

( मनुष्यबळ पुरविणा-या संस्थांकडून ई-निविदा मागविणेबाबत )

वित्त विभाग , महाराष्ट्र शासन यांच्या दिनांक ०४.१०.२०१७ च्या मान्यतेनुसार अधिनस्त असणाऱ्या संचालनालय , लेखा व कोषागारे, मुंबई तसेच अधिदान व लेखा कार्यालय वांद्रे व चर्चगेट, अधिनस्त प्रादेशिक सहसंचालक (ले व को) तसेच ३४ जिल्हा कोषागार कार्यालय येथे "गट क " संवर्गातील लेखा लिपीक व कनिष्ठ लेखापाल यांची एकूण २०५ पदे बाह्ययंत्रणेव्दारे भरण्यासाठी मनुष्यबळ पुरविणा-या नोंदणीकृत व अनुभवी संस्थांकडून ई- निविदा मागविण्यात येत आहेत.या अनुषंगाने तपशीलवार जाहिरात , ई निविदा भरण्यासाठीच्या अटी व शर्ती संचालनालयाचे https://mahakosh.maharashtra.gov.in संकेतस्थळावर (website) Tenders and Quotations या option वर उपलब्ध आहे. तसेच महाराष्ट्र शासनाचे https://www.maharashtra.gov.in/1135/e-Tendering या संकेतस्थळावर तपशीलवार जाहिरात व ई-निविदा भरण्याची सुविधा उपलब्ध आहे.

ई निविदा भरण्याचा कालावधी दिनांक १०.१०.२०१७ ते दिनांक २५.१०.२०१७ रात्री १२.०० पर्यंत राहील.

ठिकाण : मुंबई

दिनांक : ०६.१०.२०१७

संचालक
संचालनालय, लेखा व कोषागारे
मुंबई.

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
संचालनालय, लेखा व कोषागारे
मुंबई पोर्ट ट्रस्ट, पोर्ट हाऊस, ठाकरसी हाऊस,
३ रा मजला, जे .एन.हर्डिया मार्ग , बेलार्ड इस्टेट, मुंबई ४०० ००१
दुरध्वनी क्र. ०२२. २२६२२०२९/२०३६ E-mail -jd.admin@ gmail.com

क्र. संलेको/प्रशाकोषा /कार्या ५/प्रक्र २०२२ / बाह्ययंत्रणा /पदभरती /२०१७ दिनांक

प्रति,

संचालक,
शासन मुद्रण ,
लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय ,
मुंबई.

विषय : बाह्ययंत्रणेमार्फत मनुष्यबळ पुरविणा-या संस्थेमार्फत गट क संवर्गातील लेखालिपीक व कनिष्ठ लेखापालांची पदे भरण्यानुषंगे संक्षिप्त जाहिरात महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिध्द करण्याबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयांच्या अनुषंगाने सादर करण्यात येते की, संचालनालय लेखा व कोषागारे ,मुंबई तसेच विभागीय सहसंचालक, ३४ जिल्हा कोषागार व अधिदान व लेखा कार्यालय मुंबई या कार्यालयातील गट क संवर्गातील एकुण २०५ पदे बाह्ययंत्रणेव्दारे मनुष्यबळ पुरविणा-या संस्थेमार्फत भरण्यासाठी ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.

त्याअनुषंगाने ई -निविदा मागविण्यासाठीची संक्षिप्त जाहिरात कृपया महाराष्ट्र शासनाचे राजपत्रात दिनांक रोजी प्रसिध्द करण्यात यावी. सोबत संक्षिप्त जाहिरातीचा मसुदा जोडण्यात आला आहे. (सोबत सॉफ्ट कॉपी ) पाठिविण्यात येत आहे. तरी सदर जाहिरात राजपत्रात प्रसिध्द करण्यात यावी , ही विनंती .

सोबत : १. जाहिरातीचा नमुना
२. सॉफ्ट कॉपी

( विकास देसाई )
सहसंचालक ( प्रशासन )
संचालनालय ,लेखा व कोषागारे
मुंबई.

बाह्ययंत्रणेव्दारे पद भरण्यासाठी करावयाची कार्यवाही.

मान्यता प्राप्त होण्यापुर्वीचा कार्यवाही

१. ई-निविदेची प्रक्रिया पार पाडण्यासाठी समिती गठीत करणे.

अध्यक्ष व सदस्य

१. संचालक

२. सहसंचालक ( प्रशासन )

३. सहसंचालक ( संगणक )

४. उपसंचालक ( प्रशासन )

५. लेखा अधिकारी र व का

( उपरोक्त अधिका-यांपैकी अनु क्र १,२,५ वरील अधिका-यांकडे ई ऑफिससाठी आवश्यक डोंगल असुन ई- टेंडरींग साठी आवश्यक आहेत ) त्यापुर्वी सदर डोंगल कार्यरत असल्याची खात्री मंत्रालयातील NIC कडून करुन घेण्यात यावी.

मान्यता प्राप्त झाल्यानंतर करावयाची कार्यवाही

१. मान्यता प्राप्त झाल्यास प्रथम शासन मुद्रण संचालनालयाचे पत्र व संक्षिप्त जाहिरात राजपत्रात प्रसिध्द करण्यासाठी पाठविण्याची कार्यवाही करण्यात यावी.

२. मंत्रालयातील NIC महाटेंडर्स मध्ये जाहिरातीची सॉफ्ट कॉपी व तपशीलवार जाहिरात व तांत्रिक तसेच व्यापारी दराचे फॉर्म्स इ- निविदा करण्यासाठी नेण्यात यावेत. त्यावेळी सोबत ३ डोंगल /पासवर्ड सह असणे आवश्यक आहे.

( वृत्तपत्रातील जाहिरात प्रसिध्द होण्यापुर्वी १ दिवस आधी सदर कार्यवाही करण्यात यावी.)

३. त्या नंतर माहिती व जनसंपर्क कार्यालयाचे पत्र पाठविण्यात येवुन वृत्तपत्रासाठीची संक्षिप्त जाहिरात दोन वृत्तपत्रात प्रसिध्द करण्याची कार्यवाही करण्यात यावी.

४. तपशीलवार जाहिरात तसेच संचालनालयाचे संकेतस्थळावर अपलोड करण्यासाठी वेबमास्टर कडे पाठविण्यात येवून https://mahakosh.maharashtra.gov.in या संकेतस्थळावरील Tenders and Quotations या वर लोड करुन घेण्यात यावी.

महाटेंडर्स साठी आवश्यक दुरध्वनी क्रमांक

१.श्री. अतुल - ८६५२११८५३६ - २ हेमंत -९८६७०३८५५०

मनिषा देशपांडे - ९८६९४२६९२

सादर,

कनिष्ठ लेखापाल व लेखा लिपिक संवर्गातील सरळसेवेच्या एकूण ५३१ रिक्त पदांपैकी २०५ पदे ( लेखालिपिक १०५ व कनिष्ठ लेखापाल १०० पदे) बाह्ययंत्रणेमार्फत भरण्यास एक विशेष बाब म्हणून मंजूरी मिळण्याबाबतचा प्रस्ताव दि.०४.०९.२०१७ रोजी शासनास सादर करण्यात आला होता.

उपरोक्त प्रस्तावास शासनाने त्यांचे पत्र दि.०४.१०.२०१७ अन्वये मान्यता देऊन सदर प्रकरणी बाह्ययंत्रणेमार्फत काम करवून घेण्यासाठी शासनाच्या प्रचलित कार्यपध्दतीनुसार ई-निविदा प्रक्रिया पूर्ण करुन न्यूनतम दराच्या निविदाधारकाच्या प्रस्तावास शासन मान्यता घेण्याचे निर्देश दिलेले आहेत.

कनिष्ठ लेखापाल व लेखा लिपिक पदाचे अंदाजित किमान मासिक ठोक वेतन अनुक्रमे रु.२३,२००/- व रु. १५,८००/- च्या अनुषंगाने कनिष्ठ लेखापाल संवर्गातील १०० पदे व लेखा लिपिक संवर्गातील १०५ पदे बाह्ययंत्रणेद्वारे भरल्यास अनुक्रमे रु.२,७८,००,०००/- व रु.२,००,००,०००/- असा एकूण अंदाजे रु.४,७८,००,०००/-एवढा वार्षिक खर्च संभवतो.

बाह्ययंत्रणेद्वारे लिपिक वर्गीय २०५ पदे भरण्यास शासन मान्यता मिळाली असल्याने, रु.४,७८,००,०००/- इतक्या रकमेच्या ई-निविदेची नोटीस जाहिर करणे क्रमप्राप्त ठरते. सदर प्रकरणी ई-निविदा प्रक्रिया राबविण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यवाही प्राथम्याने करणे आवश्यक आहे.

| | |
|---|---|
| १. | बाह्ययंत्रणेद्वारे लिपिक वर्गीय २०५ पदे भरणेबाबत निविदा मागविण्यासाठी संक्षिप्त जाहिरात राजपत्रात प्रसिध्द करण्यासाठी शासन मुद्रण संचालनालयाकडे पत्र देणे. |
| २. | जास्तीचे खप असलेल्या दोन वृत्तपत्रात संक्षिप्त जाहिरात प्रसिध्द करण्यासाठी माहिती व जनसंपर्क कार्यालयास पत्र देणे. |
| ३. | सदर बाबतची तपशिलवार जाहिरात संचालनालयाच्या व NIC च्या महा-टेंडर या संकेत स्थळावर प्रसिध्द (upload) करणे. |

उपरोक्त क्र.१,२ मध्ये नमूद संक्षिप्त जाहिरात व पत्र प्रारुप तसेच क्र.३ मध्ये तपशिलवार जाहिरातीचे प्रारुप तयार करुन पृ.क्र. /प वर ठेवण्यात आले आहे.

मान्यतेनंतर संक्षिप्त जाहिरातीसंदर्भात संबंधित कार्यालयास पत्र निर्गमित केले जाईल व तपशिलवार जाहिरात संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

सदर प्रकरणी ई-निविदा प्रक्रिया राबविण्यासाठी उद्योग उर्जा व कामगार विभागाच्या दि.०१.१२.२०१६ च्या नियम पुस्तिकेतील अ.क्र.२.९.४ (अ) नुसार विभागीय कार्यालय म्हणून संचालनालयाच्या स्तरावर समिती गठित करणे क्रमप्राप्त ठरते.

उपरोक्त क्र.१ मध्ये नमूद केल्यानुसार निविदा प्रक्रिया राबविण्यासाठी पुढीलप्रमाणे समिती गठित करण्याचे प्रस्तावित.

| | | |
|---|---|---|
| १. | संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई. | अध्यक्ष |
| २. | सहसंचालक (प्रशासन), लेखा व कोषागारे, मुंबई. | सदस्य |
| ३. | सहसंचालक (संगणक), लेखा व कोषागारे, मुंबई. | सदस्य |
| ४. | सहसंचालक ( उद्योग उर्जा ), | सदस्य |
| ५. | उपसंचालक (प्रशासन), लेखा व कोषागारे, मुंबई. | सदस्य सचिव |

तरी उपरोक्त मान्यतेस्तव सादर.

स.ले.अ

उपसंचालक ( प्रशासन )

सहसंचालक ( प्रशासन )